दुरध्वनी २४९३४२१४ फॅक्स २४९३६८८१
अधिष्ठाता यांचे कार्यालय
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु)
डॉ.ॲनी बेझंट रोड
वरळी, मुंबई - ४०० ०१८
दिनांक : १६.५.२०१३

## पाहिजेत

रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई येथील विविध विषयांच्या प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदांवर ३६४ दिवसांचे कालावधीसाठी करार पध्दतीवर तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यांसाठी दिनांक ६.६.२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता थेट मुलाखत (Walk-in-interview) आयोजित करण्यांत येत आहेत. तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने उपलब्ध असलेल्या पदांचा विषय व तपशील खालीलप्रमाणे आहे.

| विषय | प्राध्यापक | आरक्षण | |
|---|---|---|---|
| | रिक्त पदे | सर्वसाधारण | अनुसूचित जाती |
| अगदतंत्र | १ | १ | — |
| रोगनिदान | १ | १ | — |
| शरिररचना | १ | १ | — |
| पंचकर्म | १ | १ | — |
| कौमारभृत्य | १ | १ | — |
| शालाक्यतंत्र | १ | १ | — |
| संस्कृत संहिता सिध्दात | १ | १ | — |
| एकूण | ७ | ७ | — |

| विषय | सहयोगी प्राध्यापक | आरक्षण | |
|---|---|---|---|
| | रिक्त पदे | सर्वसाधारण | अनुसूचित जमाती |
| अगदतंत्र | १ | १ | — |
| रसशास्त्र | १ | १ | — |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| एकूण | २ | २ | — |

......२

E:\Srgest\Contractpost\contractbasis(2013).doc

| | | |
|---|---|---|
| पदनाम | | प्राध्यापक |
| वयोमर्यादा | | कमाल वयोमर्यादा ६२ वर्षापर्यंत. |
| शैक्षणिक अर्हता | | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.अठ्ठावीस) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमूद केलेल्या अर्हतांपैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रिय परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय केंद्रिय वैद्यक परिषदेने वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता.<br>२) सांविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबंधित आयुर्वेदिक विषयातील पदव्युत्तर पदवी. संबंधित विषयात पदव्युत्तर पदवी अर्हता धारण करीत नसल्यास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून शिक्षक मान्यता असणे गरजेचे आहे.<br>३) ज्या उमेदवारांचे आयुर्वेदाविषयीचे स्वतःचे मूलभूत संशोधनाचे निबंध किंवा पुस्तके प्रसिध्द झालेली असतील अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यांत येईल.<br>४) मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरीत्या लिहिण्यांस, बोलण्यांस व वाचण्यांस समर्थ असला पाहिजे. |
| अनुभव | | शैक्षणिक अर्हतेमधील (१) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतरचा, मान्यताप्राप्त संस्थेतील संबंधित आयुर्वेदिक विषयाचा सहयोगी प्राध्यापक या पदाचा चार वर्षांहून कमी नसेल इतका अनुभव. |
| मानधन | | प्रतिमाह रु.५०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत). |

| | | |
|---|---|---|
| पदनाम | | सहयोगी प्राध्यापक |
| वयोमर्यादा | | कमाल वयोमर्यादा ६२ वर्षापर्यंत. |
| शैक्षणिक अर्हता | | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. अठ्ठावीस) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमूद केलेल्या अर्हतांपैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रिय परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय केंद्रिय वैद्यक परिषदेने वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता.<br>२) सांविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबंधित आयुर्वेदिक विषयातील पदव्युत्तर पदवी. संबंधित विषयात पदव्युत्तर पदवी अर्हता धारण करीत नसल्यास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून शिक्षक मान्यता असणे गरजेचे आहे.<br>३) ज्या उमेदवारांचे आयुर्वेदाविषयीचे स्वतःचे मूलभूत संशोधनाचे निबंध किंवा पुस्तके प्रसिध्द झालेली असतील अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यांत येईल.<br>४) मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरीत्या लिहिण्यांस, बोलण्यांस व वाचण्यांस समर्थ असला पाहिजे. |
| अनुभव | | शैक्षणिक अर्हतेमधील (१) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतरचा, मान्यताप्राप्त संस्थेतील संबंधित आयुर्वेदिक विषयाचा सहाय्यक प्राध्यापक या पदाचा तीन वर्षांहून कमी नसेल इतका अनुभव. |
| मानधन | | प्रतिमाह रु.४०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत). |

..........३

| | | | |
|---|---|---|---|
| इतर अटी | | १ | करार पध्दतीने करावयाच्या नियुक्तीचा कालावधी हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून किंवा आस्थापना मंडळाकडून वा बदलीने तसेच अन्य प्रशासनिक कारणास्तव पात्र उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांच्या कालावधीकरिता, यापैकी जे अगोदर घडेल तो कालावधी राहील. |
| | | २ | नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील. |
| | | ३ | सदर पदावर नियमित उमेदवाराची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस कंत्राटी स्वरुपाची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. |
| | | ४ | उमेदवारास नियमित नियुक्त आणि कार्यरत असलेल्या अध्यापकांप्रमाणे पदाची कर्तव्य आणि जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील. |
| | | ५ | नियमित नियुक्त आणि कार्यरत अध्यापकांप्रमाणेच उमेदवारांचे कामाचे तास राहतील. |
| | | ६ | उमेदवारास सार्वजनिक सुट्टी आणि रविवार व्यतिरिक्त फक्त ८ नैमित्तीक रजा अनुज्ञेय राहतील. इतर कोणत्याही प्रकारच्या रजा अनुज्ञेय राहणार नाहीत. |
| | | ७ | करार पध्दतीवरील नियुक्ती दिलेल्या उमेदवारास राजिनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी ३ महिन्यांची आगाऊ नोटीस अधिष्ठाता, रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई यांचेकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास ३ महिन्यांच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतर त्यांचा/तीचा राजिनामा अधिष्ठातांना मंजूर करता येईल. |
| | | ८ | करार पध्दतीवर नियुक्ती केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा विभागप्रमुख व अधिष्ठाता हे नियमितपणे घेतील. असा आढावा असमाधानकारक असल्यास उमेदवारांच्या नियुक्त्या पुर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठातांकडे राहतील. |
| | | ९ | करार पध्दतीच्या उमेदवारास विभागाचे प्रमुख व अधिष्ठाता यांच्या नियंत्रणाखाली आपल्या पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियमित अध्यापकांप्रमाणे पूर्णवेळ काम करणे बंधनकारक राहील. |
| | | १० | करार पध्दतीवरील नियुक्त अध्यापकांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास मुभा राहील. |
| | | ११ | करार पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही तसेच करार पध्दतीवरील काम केलेला कालावधी सेवानिवृत्तीच्या लाभासाठी विचारात घेता येणार नाही. |
| | | १२ | नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू न झाल्यास नियुक्तीवरील दावा आपोआप संपूष्टात येईल. |
| | | १३ | प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदांसाठी अर्ज करणारे उमेदवार सद्यःस्थितीत कोणत्याही महाविद्यालयात कार्यरत असतील, अशा उमेदवारांना नियोक्त्यांकडून "ना हरकत प्रमाणपत्र" प्राप्त करुन घेऊन मुलाखतीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील ("ना हरकत प्रमाणपत्राचा" नमुना पुढे दर्शविण्यांत आला आहे). तसेच प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदावर रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई येथे नियुक्ती झाल्यास उमेदवाराला पूर्वीची नोकरी सोडावी लागेल. |

..........४

## ना हरकत प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यांत येते की, वैद्य/वैद्या.............................. या महाविद्यालयात दिनांक .......... पासून ................ या पदावर कार्यरत आहेत. वैद्य/वैद्या................. .............. यांची रा.आ.पोंदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई येथे प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक या पदावर करार पध्दतीने नियुक्ती झाल्यास महाविद्यालय त्यांना कार्यमुक्त करेल व त्यांच्या या मुलाखतीस महाविद्यालयाची व संस्थेची काहीही हरकत नाही.

| संस्थाप्रमुख | प्राचार्य |
|---|---|
| .......................... | .......................... |
| ............................. | ............................. |

| | |
|---|---|
| ठिकाण : | ठिकाण : |
| दिनांक : | दिनांक : |

इच्छूक उमेदवारांनी www.mahayush.gov.in तसेच www.ayurvedinstitute.com या websites वर उपलब्ध करुन दिलेल्या विहित नमुन्यातच अर्ज भरुन, आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह अधिष्ठाता, रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई - ४०० ०१८ येथे दिनांक ६.६.२०१३ रोजी थेट मुलाखतीसाठी (Walk-in-interview) सकाळी ११.०० वाजता उपस्थित रहावे.

प्रथमतः उमेदवाराच्या प्रमाणपत्रांच्या तपासणी करण्यांत येईल. तपासणीअंती उमेदवार पात्र ठरल्यासच मुलाखत घेतली जाईल. अर्ज केलेला उमेदवार अपात्र ठरल्यास त्याची जबाबदारी त्या-त्या उमेदवाराची राहील. यास्तव फक्त पात्र उमेदवारांनीच उपस्थित राहण्यांची दक्षता घ्यावी.

सही/-
अधिष्ठाता
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु)
वरळी, मुंबई

# अर्जाचा नमुना
## महाराष्ट्र शासन
## रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई - ४०० ०१८

पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून त्यावर स्वतः स्वाक्षरी करणे.

रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालयातील प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक …… ……………… (विषय) या पदावर करार पध्दतीने ३६४ दिवसांच्या कालावधीकरीता नियुक्तीसाठी अर्ज

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | संपूर्ण नांव | : | | | |
| | | | आडनाव | स्वतःचे नांव | वडिलांचे/पतीचे नांव |
| २) | पत्रव्यवहाराचा पत्ता | : | पिनकोड | | |
| | | | एसटीडी कोडसह घरचा दुरध्वनी क्रमांक :<br>भ्रमणध्वनी क्रमांक :<br>Email address : | | |
| ३) | जन्मदिनांक | : | | | |
| ४) | अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिनांकास वय :- वर्ष महिने दिवस | | | | |
| ५) | राष्ट्रीयत्व : | | | | |

६) ज्या प्रवर्गासाठी अर्ज करावयाचा आहे त्या ठिकाणी (✓) अशी खुण करावी. एकापेक्षा जास्त खुणा केल्यास अर्ज बाद समजला जाईल.

| अ.जा. (SC) | अ.ज. (ST) | वि.जा.(अ) (VJ-A) | भ.ज.(ब) (NT-B) | भ.ज.(क) (NT-C) | भ.ज.(ड) (NT-D) | वि.मा.प्र. (SBC) | इ.मा.व. (OBC) | खुला (OPEN) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

७) जात वैधता प्रमाणपत्र आहे का : होय / नाही

८) शैक्षणिक अर्हता : बीएएमएस प्रथम वर्षपासून सुरुवात करावी व सोबत सर्व वर्षाच्या साक्षांकित मार्कशिट जोडाव्यात.

| अ.क्र. | बोर्डाचे / विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण केलेल्या परीक्षा | उत्तीर्ण केल्याचे वर्ष | प्राप्त टक्केवारी | शासकीय सेवेतून निवृत्त झाले असल्यास, प्रथम नियुक्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |

९) अवगत असणाऱ्या भाषा : (योग्य ठिकाणी (✓) अशी खूण करावी.)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | संस्कृत / अन्य |
|---|---|---|---|
| | | | |

१०) कामाचा अनुभव : (प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडल्या असतील तरच ग्राहय धरला जाईल.)

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेले पद | वेतनश्रेणी व इतर भत्ते | अनुभवाचा कालावधी | विद्यापीठाची मान्यता होती काय? असल्यास विद्यापीठाचे पत्र जोडावे | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| ११) | प्रकाशित लेखांचा तपशील (लेखांच्या साक्षांकित प्रती जोडण्यांत याव्यात) | |
| | | |
| | प्रकाशित पुस्तकांचा तपशील : | |
| | | |
| १२) | पुरस्कार मिळाले असतील तर त्यांचा तपशील (प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडण्यांत याव्यात) | |
| | | |
| १३) | अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा तपशिल : | |
| | १. | |
| | २. | |
| | ३. | |
| | ४. | |
| | ५. | |
| | ६. | |
| | ७. | |
| | ८. | |
| | ९. | |
| | १०. | |

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती/कुमारी.............................................. प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/करते की, वर नमूद केलेली माहीती पूर्णतः खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या ठिकाणी कोणत्याही टप्प्यावर किंवा नियुक्तीनंतर रद्द करण्यांत येईल आणि माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई होईल, याची मला जाणीव आहे. तसेच सदरची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पध्दतीवर असल्यामुळे नियमित नियुक्तीसाठी मला हक्क सांगता येणार नाही आणि जाहिरातीत उल्लेखित कारणास्तव नियमित नियुक्तीचा उमेदवार उपलब्ध झाल्यास माझी तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी नेमणूक आपोआप रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी